


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीची प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : ५८ वा बुधवार दि. ०२ एप्रिल २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# शेगाव-खामगाव महामार्गावरील तिहेरी अपघात
# ७ ठार, २२ जखमी!

## अपघाताचा भीषण तडाखा: बोलेरोचा अक्षरश चेंदामेंदा टोलदर वाढले, पण सुरक्षेची हमी कुठे? प्रवाशांचा संताप!!

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातून एक खळबळजनक घटना समोर आली आहे. शेगाव-खामगाव महामार्गावर झालेल्या तिहेरी अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला असून २४ जण गंभीर जखमी झाले आहेत. खाजगी प्रवासी बस, एसटी बस आणि बोलेरो या तिन्ही वाहनांचा जबर धडक झाल्याने भीषण अपघात घडला. प्राथमिक माहितीनुसार, आज सकाळी साडेपाचच्या सुमारास शेगावकडून कोल्हापूरकडे भरधाव निघालेली बोलेरो कार एसटी महामंडळाच्या बसवर धडकली. त्याच वेळी, पाठीमागून भरधाव येणाऱ्या खासगी प्रवासी बसने या अपघातग्रस्त वाहनांना जोरदार धडक दिली. या भयंकर अपघातात ५ जण ठार झाले, तर २४ जण गंभीर जखमी झाले आहेत. घटनास्थळी तातडीने पोलीस व आपत्ती व्यवस्थापन पथक दाखल झाले असून, जखमींना खामगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हा अपघात इतका भयंकर होता की बोलेरोचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे. जखमींपैकी सात जणांची प्रकृती चिंताजनक असून, खासगी बसच्या चालकाला अद्याप बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून, महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. बुलढाणा जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर देखील पुन्हा एकदा सुरक्षेचा फज्जा उडाल्याचे समोर आले आहे. चानेज ३२० जवळील एका पुलावर लोखंडी अँगल तुटून महामार्गावर पडल्याने रात्रीच्या वेळेस आठ वाहनांचे टायर फुटले. भरधाव वेगाने जाणारी वाहने या लोखंडी तुकड्यावर आदळल्याने अनेक वाहनधारक महामार्गावर अडकले. धक्कादायक म्हणजे, महामार्ग प्रशासन आणि कंट्रोल रूमला वारंवार फोन करूनही मदत पोहोचायला तब्बल एक तास लागला. विशेष म्हणजे, नुकतीच समृद्धी महामार्गावरील टोलची दरवाढ १९ टक्क्यांनी करण्यात आली आहे. मात्र, प्रवाशांच्या सुरक्षेबाबत महामार्ग प्रशासन अजूनही गंभीर होताना दिसत नाही. यापूर्वीही




अशा घटनांमुळे अनेक अपघात झाले असूनही उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. प्रवाशांच्या जिवाशी खेळणाऱ्या या बेफिकीर प्रशासनावर कठोर कारवाई होणार का, हा प्रश्न उपस्थित झाला आहे!

---

# माझ्यासोबत विवाह कर नाही तर तुला सोडणार नाही!

## आरोपीने इच्छेविरुद्ध ठेवले शारीरिक संबंध!

**जनसंचलन/बुलढाणा**

किरण देवानंद थोरात याला बायको नाही परंतु त्याने एका विधवा महिलेचा गैरफायदा घेत तिच्या इच्छुविरुद्ध संबंध ठेवले. माझ्यासोबत विवाह कर नाही तर तुला सोडणार नाही! अशा पवित्र्यात किरण थोरात आल्याने त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. एका महिलेने याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. आरोपी किरण देवानंद थोरात रा. धाड हा एका विधवा महिलेशी जवळीक साधून होता. २०१८ -१९ मध्ये रेशन कार्ड काढण्यासाठी सदर महिला तहसील ऑफिस बुलढाणा येथे गेली होती आणि तिथेच खाजगी काम करीत असणाऱ्या आरोपीची ओळख झाली. दरम्यान आरोपी किरण थोरात याने जवळ आलेल्या मोबाईल नंबर वर अनेकदा फोन करून महिलेशी जवळीक निर्माण करण्याचा प्रयत्न केला.आरोपीची पत्नी सुद्धा वारलेली आहे.त्यामुळे गेल्या दोन वर्षापासून सदर महिलेला माझ्यासोबत विवाह कर नाहीतर मी तुला सोडणार नाही तुझ्या मुलावर खोटा ॲट्रॉसिटी चा गुन्हा दाखल करील अशी धमकी सदर महिलेला व तिच्या आईला आरोपी देत होता.दरम्यान २१ मार्च रोजी दुपारी महिला बुलढाणा येथील पाठक गल्लीत श्रीकृष्ण डेअरीवर आली असता, कारंजा चौकात आरोपी किरण थोरात याने महिलेचा पाठलाग केला आणि महिलेशी नाहक वाद घातला. माझ्यासोबत चल आणि लग्न कर अशी जबरदस्ती आरोपीने केली. माझ्यासोबत आली नाही तर जिवाने मारून टाकेल अशी धमकी सुद्धा यावेळी दिली. पीडित महिला घाबरल्याने त्याच्या स्कुटीवर बसून पाठक गल्ली येथून धाड गावाला जाण्यासाठी निघाली. आरोपीच्या घरी कोणी नव्हते. त्याचा फायदा घेत किरण थोरातने महिलेच्या इच्छेविरुद्ध शारीरीक संबंध ठेवले.बायको म्हणून धाडला राहा असे आरोपीने म्हटल्यावर महिलेने याला विरोध केला तेव्हा तुला जिवे मारील अशी धमकी दिली.या पीडित महिलेच्या तक्रारीवरून किरण थोरात विरुद्ध विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# .....चांगले कर्म करा.....

## संपादकीय लेख

आपलं शरीर हे अनेक व्याधींची जननी आहे. या शरीरात नाना प्रकारचे रोग होत असतात. जे रोग शरीराला घातक असतात. शरीराला रोग का होतात? असा जर कोणी प्रश्न विचारल्यास त्याचं नेमकं उत्तर आपल्याला सापडतं. ते म्हणजे ताणतणाव. आपण नेहमीच ताणतणावात वावरत असतो.

माणूस जन्मल्यापासून मरेपर्यंत माणसाला आयुष्यभर टेन्शन असतं. आता म्हणाल की जन्मतः बरोबर कोणतं टेन्शन असतं बाळाला? होय, जन्मतः बरोबरही टेन्शन असतं. कधी भूक लागली आणि आईनं दूध पाजायला वेळ केला तर त्यामुळं सुद्धा येतं लहान बाळाला मानसिक टेन्शन. काही काही काही मुलं नाजायज पैदा होतात तेव्हा त्याची आई त्याला कचऱ्यात फेकून देते. तेही त्या लहान बाळाला टेन्शन. त्यातच काही काही मुलांना जन्मतःच व्याधी असतात. त्यावेळी त्या लहान बाळालाही इंजेक्शनं टोचली जातात. तेव्हा तेही त्या बाळाचं टेन्शन. अलिकडे तर लहान बाळाला शौचालयाची जागाच राहत नाही हेही बाळाचं टेन्शन नाही का? काही काही लोकं बाळाचा गुप्त धनासाठी बळी देतात. हेही टेन्शन नाही का? कधी बाळाला जन्म दिल्यानंतर आईचा मृत्यू होतो. हेही बाळासाठी टेन्शन नाही का? त्यावेळी बाळ अनाथ होते, हळूहळू बाळ मोठं होतं. त्यावेळी त्याला त्याची आई मरण पावल्यास खंत असते व अगदी लहानपणापासूनच त्याला अनाथाचं जीवन जगावं लागतं. बाप दुसरा विवाह करुन मोकळा होतो. कधीकधी काही मुलांचे तर मायबाप दोघंही मरण पावतात तेव्हा तर त्यांचं जीवन अगदी असह्य असतं. आज सरकार शाळेच्या माध्यमातून सांगत असतं की ताणतणावरहित रहा. परंतु अशी मुलं कशी ताणतणावरहित राहतील. कोणी कितीही अशा मुलांचं दुःख दूर करण्याचा प्रयत्न केला तरी त्या मुलांचं दुःख कोणीच दूर करू शकत नाही. आपलं दुःख आपल्यालाच दूर करावं लागतं. दुःखाबाबत सांगायचं झाल्यास दुःख येण्याला भाग्याची जोड असते असं म्हातारी माणसं म्हणत होती. कोणी म्हणायचे की पूर्व जन्मात आपण पाप केलं असेल, म्हणून आपल्याला त्याचे भोग म्हणून असे दिवस पहायला मिळाले. परंतु भाग्याला आजचा काळ मानत नसल्यानं ते पूर्वजन्माचं पापपुण्य समजता येत नाही. परंतु एका अर्थानं विचार केल्यास ज्या वेळी माता जन्म दिल्यानंतर बाळाला फेकून देते. हे फेकून देताना ज्या बाळाला ती फेकून देते, त्या बाळाचा कोणता दोष असतो? ह्याला पूर्वजन्माचं पाप म्हणता येऊ शकते. कारण कदाचित मागील जन्मात त्याच आईला तिचा जन्म झाल्यानंतर त्या बाळानं फेकून दिलं असेल हे नाकारता येत नाही. आजकाल जन्म घेताना काही काही मुलांचा जन्म अशा ठिकाणी होतो की त्या ठिकाणी धड बाळाला पोटभर खायला मिळत नाही. तसेच काही काही बाळाचा जन्म अशा ठिकाणी होतो की ज्याच्या पायाशी सुख लोटांगण घेत असतं. ह्याला काय समजावं? त्याला पूर्व जन्माचं पापपुण्य समजता येत नाही तर काय?

अलिकडे कोरोनाच्या काळात हाच अनुभव आला. काही काही काही माणसं धडधाकट असूनही तसेच ती उत्तम प्रकारची काळजी घेऊनही ती कोरोनानं मरण पावली. अन् काही काही माणसं धडधाकट नसूनही व कोणत्याही प्रकारची काळजी न घेऊनही जगत आहेत. यालाही पापपुण्य समजता नाही येऊ शकत काय? हे आपलं पापपुण्यच आहे. परंतु जो मानेल किंवा समजेल. त्याला ते पापपुण्य कळेल. महत्त्वाचं म्हणजे आपले चांगले कर्म आपल्याला चांगलं फळ देऊ शकतात. तसेच आपले वाईट कर्मच आपल्याला वाईट कर्म प्रदान करतात. कोणी म्हणतात की आपण जे कर्म करतो. त्याचे फळ त्याच जन्मात प्राप्त होत असते. कारण असा जन्म वा पुनर्जन्म कोणीही पाहिलेला नाही. परंतु हे जरी खरं असलं तरी पुनर्जन्म नाही असं म्हणता येत नाही वा मानता येत नाही. पुनर्जन्म असेल व जे पापकर्म वा पुण्यकर्म या जन्मात भोगता आलं नसेल, ते भोगायला दुसरा जन्म नक्कीच मिळत असेल. म्हणून चांगले कर्म करा व चांगले फळ चाखायला दुसरा जन्म घेऊन अवश्य या. कारण आपण जे बीजारोपण करू तेच फळ आपल्याला चाखायला मिळेल. आंब्याच्या झाडाला कधीच संत्री लागणार नाहीत. तसंच कर्माचंही आहे. त्यामुळं वाईट कर्माचं रुपांतरण कधीच चांगल्या कर्मात होणार नाही. वाईट कर्माचं फलित वाईटच निघेल आणि चांगल्या कर्माचं फलित चांगलं. मग कितीही जन्म घेतले तरी कर्माचं फळ कधीच बदलणार नाही आणि हीच सत्य गोष्ट आहे वस्तुस्थितीला धरून आणि ही सत्य बाब कधीच नाकारता येत नाही.

# मैत्री जुन्या काळाची: हर्षवर्धनदादा सपकाळ आणि बिस्मिल्ला भाई यांचे अविस्मरणीय नाते

## रहने को सदा दहर में आता नहीं कोई।तुम जैसे गए ऐसे भी जाता नहीं कोई।

जनसंचलन/बुलढाणा

समाजकार्य आणि मैत्रीचा वारसा जपणारे काँग्रेसचे नवनियुक्त महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धनदादा सपकाळ (बंटी दादा) यांनी आपल्या जुने मित्र मरहूम बिस्मिल्ला भाई (बिसू) यांची आठवण ठेवत एक हृदयस्पर्शी उदाहरण सादर केले. १९९५ मध्ये जिल्हा परिषदेत निवडून आलेले आणि नंतर बुलढाणा विधानसभेचे आमदार राहिलेले हर्षवर्धनदादा सपकाळ आणि देऊळघाटचे माजी जिल्हा परिषद सदस्य बिस्मिल्ला भाई यांचे नाते केवळ राजकीय नव्हे, तर भावनिक व पारिवारिकही होते. हर्षवर्धनदादा सपकाळ बिस्मिल्ला भाईंना नेहमीच बिसू या आपुलकीच्या नावाने संबोधित करत. २००६ मध्ये हर्षवर्धनदादांनी बिस्मिल्ला भाईंना जिल्हा परिषद निवडणुकीत संधी दिली आणि ते भरघोस मतांनी विजयी झाले. गरीब, दुर्बल घटकांचे आधारस्तंभ म्हणून ओळखले जाणारे




बिस्मिल्ला भाई २००८ मध्ये आजाराने निधन पावले. त्यांच्या निधनाने हर्षवर्धनदादांना मोठा धक्का बसला. बिछड़ा कुछ इस अदा से कि रुत ही बदल गई।एक शख़्स सारे शहर को वीरान कर गया। गेल्या ३० वर्षांत हर्षवर्धनदादा सपकाळ अनेक मोठ्या पदांवर कार्यरत राहिले, परंतु त्यांनी आपल्या मित्राची आणि त्याच्या कुटुंबाची आठवण कधीही विसरली नाही. २०२५ मध्ये काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी स्विकारल्यानंतर ते प्रथमच रमजान ईद निमित्त देऊळघाट येथे पोहोचले. ईदच्या दिवशी मुस्लिम बांधव कब्रस्तानमध्ये जाऊन आपल्या प्रियजनांसाठी दुआ करतात. याच परंपरेला सन्मान देत, हर्षवर्धनदादांनी आपल्या जिवलग मित्राच्या कबरीवर जाऊन श्रद्धांजली अर्पण केली. आजही बिस्मिल्ला भाई नसले तरी मैत्रीचे नाते अढळ आहे. देऊळघाट आणि हर्षवर्धनदादा यांचे संबंध अजूनही कायम असून, त्यांनी पुन्हा एकदा आपल्या निष्ठेने आणि आपुलकीने एक वेगळा आदर्श घालून दिला आहे.

# उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचा तालुका शिबिर दौरा कार्यक्रम जाहीर

जनसंचलन/बुलढाणा

माहे एप्रिल ते जून २०२५ दरम्यान राबविण्यात येणारा उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या तालुका शिबिर दौरा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. शिबिराच्या ठिकाणी मोटार वाहन निरीक्षक व सहायक रोखपाल हजर राहणार आहेत. नागरिकांनी तालुका स्तरीय शिबीरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ज्ञानेश्वर हिरडे यांनी केले आहे. शिबिर दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे : एप्रिल महिण्यात जळगांव जामोद येथे ४, शेगांव ७ व २४, मेहकर ९ व २९, खामगांव ११ व २५, मलकापूर १५ व २८, चिखली १६, देऊळगांव राजा १७, लोणार २२, नांदुरा २१, सिंदखेडराजा २३ रोजी होणार आहे. माहे मे महिण्यात जळगांव जामोद ५, शेगांव ६ व २६, मेहकर ८ व ३०, खामगांव १३ व २७, मलकापूर १४ व २९, चिखली १६, देऊळगाव राजा १९, लोणार २०, नांदुरा २२, सिंदखेड राजा २३ रोजी होणार आहे. तसेच माहे जून महिण्यात जळगांव जामोद येथे ५, शेगांव ६ व २४, मेहकर ९ व ३०, खामगांव १० व २६, मलकापूर १२ व २७, चिखली १६, देऊळगाव राजा १७, लोणार १९, नांदुरा २०, सिंदखेड राजा २३ रोजी होणार आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महाराष्ट्रावर मोठं अवकाळी संकट, ऐन उन्हाळ्यात गारपीटीची शक्यता

**पुणे** : मागील ३ दिवसांपासून राज्यात बहुतांश ठिकाणी ढगाळ वातावरण आहे. येणाऱ्या दोन-तीन दिवसांत राज्यात बहुतेक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विजेच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. राज्यात अनेक ठिकाणी गारपीठ होण्याची शक्यता आहे. पुणे, नाशिक, नगर, जळगाव, सातारा या ठिकाणी गारपीठ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना उद्या आणि परवा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. एकीकडे राज्यात सर्वदूर पावसाच्या सरी बरसणार असतानाच एप्रिल, मे, जूनमध्ये देशात सरासरीपेक्षा जास्त तापमान असणार असल्याची देखील माहिती हवामान विभागाने दिली आहे. येणाऱ्या पाच दिवसांत मराठवाड, मध्य महाराष्ट्रात जोरदार पावसाची शक्यता आहे. पुणे हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी आज पत्रकार परिषदेत याबाबत महत्त्वाची माहिती दिली राज्यात गेल्या तीन दिवसांपासून ढगाळ वातावरण दिसत आहे. त्याला मुख्य कारण म्हणजे मध्य महाराष्ट्रात हवेत चक्रीय स्थिती आहे. त्यामुळे वातावरणातील खालचा जो भाग आहे, तिकडे पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणारे वारे असतात. वरच्या थरात पश्चिमेकडून पूर्वेकडे जाणारे वारे असतात. अशी परिस्थिती ढगाळ वातावरणासाठी तथा विजांच्या कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पाऊस पडण्यासाठी पुरक असते. अशी परिस्थिती मागच्या दोन दिवसांपासून दिसत आहे, अशी माहिती हवामान विभागाचे डॉ. एस. डी. सानप यांनी दिली.येणाऱ्या दोन ते तीन दिवसांत महाराष्ट्रातील बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामध्ये कोकण किनारपट्टी परिसरात विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याचा विचार केला तर या विभागातील काही जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर काही जिल्ह्यांमध्ये गारपीटदेखील होण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती ४ आणि ५ तारखेला पूर्वेकडे स्थलांतरित होऊन विदर्भात या दिवशी विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे, अशी माहिती सानप यांनी दिली.मध्य महाराष्ट्रातील पुणे, नाशिक, नगर, जळगाव, सातारा, जालना, छत्रपती संभाजीनगर येथे विजांच्या कडकडाटासह पावसाची किंवा काही ठिकाणी गारपीटची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील



बहुतांश ठिकाणी पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. आज आणि उद्यासाठी ऑरेंज अलर्ट आहे. नंतर तो येलो अलर्ट असेल, अशी माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली आहे.

एप्रिल, मे, जून या तीन महिन्यांमध्ये देशात सरासरी पेक्षा जास्त तापमान असण्याची शक्यता आहे. पुढचे पाच दिवस ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. त्यानंतर तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. सध्या येणारा पाऊस हा मान्सून पूर्व पाऊस आहे, असंही हवामान विभागाचे तज्ज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी सांगितलं.

# कल्याणमधील पलावा पुलाचे कुणाल कामराच्या हस्ते उद्घाटन, मनसे नेते राजू पाटलांचा बॅनर चर्चेत...

**कल्याण:** कल्याण शीळ रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी होते. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी दोन्ही पलावा फुलांचे काम सुरू झाले. अनेक वर्षापासून हे काम सुरू आहेत. वारंवार पाठपुरावा करू ही अद्याप पुलाचे काम झाले नाही. आता मनसे नेते राजू पाटील ( ) यांनी सुरू असलेल्या पुलाच्या समोर भला मोठा एक बॅनर लावला आहे. या पुलाचे उद्घाटन ३१ एप्रिल रोजी स्टँडअप कॉमेडीयन कुणाल कामराच्या हस्ते होणार आहे. असे लिहिले आहे. एवढेच नाही तर तारखांच्या आश्वासनांनी फुलं! कधी होणार पलावा पूल?... की बनत होता.. बनत आहे.. आणि बनतच राहील पलावा पूल? असा सवाल देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ट्विटचा माध्यमातून राजू पाटील यांनी उपस्थित केला आहे.कल्याण- शीळ रस्त्यावर वाहतूक कोंडीमुळे वाहन चालक ,नागरिक विशेषकरुन शाळकरी विद्यार्थी त्रस्त आहेत. अनेकदा वाहतूक कोंडीमुळे




शाळा बंद करण्याची वेळ आली आहे. या रस्त्यावर मेट्रोचे काम सुरू आहे. एकीकडे मेट्रोचे काम दुसरीकडे काही प्रमाणात रस्त्याचे काम आणि पलावा पुलाचे देखील काम सुरू आहे.

# घराबाहेर रात्री खाटेवर झोपले ते उठलेच नाही, सकाळी समोरील दृष्य पाहून कुटुंबियांचा टाहो; तरुणासोबत भयंकर घडलं

**पुणे** : घराच्या बाहेर खाटेवर झोपलेल्या एका शेतकऱ्याच्या डोक्यात दगड किंवा तीक्ष्ण हत्याराने हल्ला करून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील रायवाडी रस्त्यावरील रायवाडी परिसरात घडली आहे, आज मंगळवारी (१ एप्रिल रोजी) सकाळी ही घटना उघडकीस आली आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. रवींद्र काशिनाथ काळभोर (वय ४५, रा. वडाळे वस्ती, टाकेचा माळ, रायवाडी रोड, लोणी




काळभोर) असं हत्या झालेल्या मृत शेतकऱ्याचं नाव आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रवींद्र काळभोर हे लोणी काळभोर परिसरात आपल्या कुटुंबासह राहत होते. शेती हाच त्यांच्या उदरनिर्वाहाचा मुख्य आधार होता. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने रवींद्र हे घराच्या अंगणात खाटेवर झोपले होते.सोमवारी, ३१ मार्च रोजी रात्री नेहमीप्रमाणे रवींद्र खाटेवर झोपले होते. मंगळवारी सकाळी त्यांना उठवण्यासाठी घरच्यांनी आवाज दिला, मात्र त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर जवळ जाऊन पाहिले असता, रवींद्र यांच्या डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याचं दिसून आलं. ते खाटेवरच निश्चल अवस्थेत पडले होते. ही भयानक घटना पाहून कुटुंबीयांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली.या घटनेची माहिती मिळताच लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस उपनिरीक्षक अनिल जाधव, पोलीस अंमलदार चंद्रधर शिरगिरे, प्रदीप गाडे, सूरज कुंभार, मंगेश नानापुरे, संदीप धुमाळ आणि त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून, हत्येचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी प्राथमिक तपासात रवींद्र यांच्या डोक्यावर दगड किंवा तीक्ष्ण हत्याराने हल्ला झाल्याचं निष्पन्न केलं आहे. हल्लेखोर कोण होते आणि या हत्येमागचं नेमकं कारण काय, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांची टीम कार्यरत आहे. परिसरातील नागरिकांमध्येही या घटनेमुळे भीतीचं वातावरण पसरलं आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# गवत आणायला गेली, परतलीच नाही; शेतात साडीचा तुकडा, फुटलेल्या बांगल्या अन्... घटनेने सारे शॉक....

**अहिल्यानगर:** शेतात गवत आणण्यासाठी गेलेली महिला अचानक गायब झाली. तिच्या अंगातील साडीचा तुकडा, मोबाईल कव्हर, विळा रक्त लागलेल्या अवस्थेत शेतात सापडल्याने तिला बिबट्याने उचलून नेलं असावं असा अंदाज बांधत ग्रामस्थांमध्ये चर्चा होऊ लागली. या महिलेला बिबट्याने अफवा पसरली नातेवाईकांनी राहुरी पोलीस ठाण्यात ती बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. घटनास्थळ आणि परिसरात वन विभाग आणि पोलिसांनी शोध मोहीम सुरू केली. पोलिसांनी ४८ तासात शोध घेत पहिले नगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील संबंधित महिलेला तिच्या लहानपणीच्या मित्रासोबत ताब्यात घेतले. त्यामुळे संबंधित महिलेला बिबट्याने नेलं नसून ती तिच्या प्रियकरासोबत पळून गेल्याचं समोर आलं आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर येथील ३७ वर्षीय विवाहित महिला ही राहत्या घरी बारागाव नांदूर येथून २८ मार्चला गवत कापायला जाते असे सांगून त्यांच्या शेतातील उसात गेली होती. महिलेच्या घरी दोन जनावरे असल्यामुळे तिचा पती सकाळ - संध्याकाळ जनावरांसाठी गवत आणायला जात असतो. २८ मार्चला पतीची तब्येत बरी नसल्याने ती सायंकाळच्या सुमारास एकटीच गवत आणायला गेली होती. संध्याकाळी साडेसहा सात वाजूनही ती परत न आल्यामुळे तिचे कुटुंबीयांनी शेतात जाऊन तिचा शोध घेतला असता तिच्या साडीच्या कापडाचा तुकडा, मोबाईलचं कव्हर, तिचं मंगळसूत्र, हातातील फुटलेल्या बांगड्या, मोबाईल बॅटरी, तसेच गवत कापण्यासाठी नेलेला विळा रक्त लागलेल्या स्थितीत दिसले. तसेच, कापून ठेवलेले गवतही अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले, त्यामुळे ती गवत कापत असताना तिला बिबट्याने हल्ला करून नेलं असा समज कुटुंबाचा झाला आणि त्यांनी तात्काळ पोलीस आणि फॉरेस्ट विभागाशी संपर्क साधला. पोलीस आणि फॉरेस्ट विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी, तसेच गावातील चारशे ते पाचशे नागरिकांनी सदर महिलेचा आजूबाजूच्या सर्व परिसरात शोध घेतला. परंतु ती मिळून न आल्याने नातेवाईकांनी ३० मार्चला ती बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली.

सदर घटना घडल्या ठिकाणाची पोलीस विभागामार्फत फॉरेन्सिक टीम व श्वानपथक यांच्यामार्फत बारकाईने तपासणी करण्यात आली. परंतु सदर ठिकाणी कोठेही बिबट्याचा हल्ला झाला आहे, असा पुरावा मिळाला नाही. त्यावरून महिलेकडून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला गेला अशी खात्री



पोलिसांना झाली. परंतु, सदर विवाहित महिला गायब झाल्यामुळे गावात दहशतीचे वातावरण तयार झाले होते. महिला शेतात जाण्यास घाबरु लागल्या होत्या. त्यामुळे पोलिसांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत महिलेचा शोध घेण्यास सुरवात केली आणि पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार व अचूक तांत्रिक विश्लेषणातून सदर महिलेचा शोध घेतला असता ती महिला प्रवरा संगम तालुका येथे मिळून आली. तेव्हा ती तिच्या लहानपणीच्या प्रियकरासोबत पळून गेल्याचं समोर आलं.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबरमे साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे साहेब यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांचे नेतृत्वात महिला पोलीस उपनिरीक्षक ज्योती डोके पोलीस पो. ना. गणेश सानप, पोहेका विकास वैराळ, पोलीस शिपाई सागर नवले, अंबादास गीते, प्रमोद ढाकणे, सायबर सेल दक्षिण विभाग सचिन धनाड यांच्या पथकाने केली.

# तरुणाला भरदिवसा दोघांनी संपवलं, प्रेमप्रकरणातून घडली भयंकर घटना...


**बीड:** बीड जिल्हा पुन्हा एकदा हादरला आहे. येथे दोन युवकांकडून दिवसाढवळ्या एका तरुणावर कोयत्याने सपासप वार करण्यात आले. या घटनेत उपचारादरम्यान त्या तरुणाचा मृत्यू झाला आहे. मंगळवारी (१ एप्रिल) सकाळी ९ वाजताच्या दरम्यान घडल्याची माहिती आहे. आहे. राजकुमार साहेबराव करडे (वय ३०, रा. गवळीपुरा, अंबाजोगाई) असं या हल्ल्यात मृत्यू झालेल्या तरुणाचं नाव आहे. प्रेमप्रकरणातून ही हत्या झाल्याची माहिती आहे.दोन युवकांनी कोयता सदृश धारदार हत्याराने राजकुमारच्या गळ्यावर, डोक्यात, पाठीवर सपासप वार करून त्याला गंभीर जखमी केले आहे. जखमी युवकावर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आहे.




अंबाजोगाई शहराला सुसंस्कृत म्हटले जाते. मात्र, याच शहरात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अंबाजोगाई शहरातील पोखरी रोडवर सारडा नगरी जवळ दोन तरुणांनी राजकुमार साहेबराव करडे या तरुणाच्या गळ्यावर, डोक्यात, पाठीवर कोयता सदृश्य धारदार हत्याराने सपासप वार करून त्यास गंभीर जखमी केले. या हल्ल्यात राजकुमार गंभीर जखमी झाला. त्याच्यावर स्वाराती रुग्णालयात उपचार सुरू होती. मात्र डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न करूनही अतिरिक्तस्त्रावामुळे राजकुमारचा उपचार सुरु असतानाच मृत्यू झाला.दरम्यान, हा हल्ला कोणी व कोणत्या कारणामुळे केला याबाबत सध्या कुठलीही अधिकृत माहिती नाही. अंबाजोगाई शहर पोलीस याप्रकरणाचा तपास करत असून लवकरच याप्रकरणी खुनाचा गुन्हा नोंद होणार असल्याचे समजते. मात्र, सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार प्रेमप्रकरणातून ही हत्या करण्यात आल्याची माहिती आहे.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांड घटनेने जिल्हा हादरून गेलेला आहे. त्याचबरोबर जिल्ह्यात रोज नवनवीन घटना समोर येत असून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे.

# तुमच्यासमोर लहानाचा मोठा झालो, पुन्हा एकत्र यायचं ठरवलंच होतं, निलेश राणे भावूक



**सिंधुदुर्ग :** कुडाळ मालवण विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना आमदार निलेश राणे कुडाळमधील एका कार्यक्रमादरम्यान कार्यकर्त्यांबद्दल बोलताना भावूक झालेले पाहायला मिळाले. राणे कुटुंबासोबत काम केलेले हे कार्यकर्ते कोणे एके काळी कट्टर विरोधक बनले होते. मात्र त्यांनी आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेमध्ये प्रवेश केल्यामुळे पुन्हा एकत्र आल्याचे पाहून निलेश राणे यांनी समाधान व्यक्त केले. मला लहानपणापासून बघितलेली ही सगळी मंडळी आहेत. माझ्याकडे शब्द नाहीत तुमचे आभार मानायला. मी लहानाचा मोठा तुमच्यासमोर झालेलो आहे. माझ्या मनात एकच विचार असायचा, जेव्हा आपण वेगवेगळ्या पक्षांमध्ये होतो, माझ्या मनामध्ये मी एक दिवस ठरवलं होतं, की कधीतरी एक दिवस असा येईल, जेव्हा परत हे सगळे जण व्यासपीठावर एकत्र येतील, अशा भावना निलेश राणे यांनी व्यक्त केल्या.ज्यांच्या समोर मी लहानाचा मोठा झालो, त्यांनी मला राजकीय संस्कार दिलेत. राणे साहेब यांचं मार्गदर्शन तर आहेच. त्यांनी मला शिकवलं ते माझे गुरू आहेतच. संजय पडते, काका कुडाळकर, दत्ता सामंत यांनी मला मोठं केलं, त्यांना मी कधीतरी एकत्र आणणार. राणे साहेबांच्या लोकांना मी वेगळ्या आशेने बघायचो, यांना कोणताही त्रास, अडचण होता नये. हे आहेत त्यामुळे आम्ही आहोत. ही भावना मनात घेऊन राजकारणात उतरलो. निलेश राणेंच्या रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत जेवढं काय करायचं, ते मी करणार असे निलेश राणे म्हणाले.याआधी, छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त त्यांच्या वढू बुद्रुक समाधी स्थळावरून धर्मवीर ज्वाला सिंधुदुर्ग जिल्ह्यात निलेश राणे यांच्या कुडाळ मतदारसंघात येथे आली होती. या कार्यक्रमामध्ये निलेश राणेंनी छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन करत हिंदू धर्माची परंपरा, शंभूराजांनी धर्मासाठी दिलेलं बलिदान, त्याग याविषयी भाष्य केलं.


# राज्यावर कर्जाचं ओझं, भाजप नेत्यांच्या कारखान्यांना ४३६ कोटी; कोणाकोणावर सरकारची कृपादृष्टी?

**मुंबई:** राज्य सरकारवरील कर्जाचं ओझं वाढत असल्यानं शेतकरी कर्जमाफी, लाडकी बहिणीचा हफ्ता वाढवण्यास महायुती सरकारनं असमर्थतता दर्शवली. विधानसभा निवडणुकीआधी दिलेली आश्वासनं पूर्ण करताना सरकारला धाप लागत असल्याचं चित्र दिसू लागलं आहे. अर्थमंत्री अजित पवार सातत्यानं आर्थिक शिस्तीची भाषा करत आहेत. राज्यावर असलेल्या कर्जाचा उल्लेख करत आहेत. पण अशा परिस्थितीत सरकारनं काही साखर कारखान्यांना कर्ज देण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे हे कारखाने भाजप नेत्यांशी संबंधित आहेत.सरकारनं नॅशनल कोऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनकडून (एनसीडीसी) ४३६ कोटी रुपयांचं कर्ज घेण्याचं ठरवलं आहे. हे कर्ज दोन सहकारी साखर कारखान्यांना देण्यात येईल. या साखर कारखान्यांचा संबंध भाजप नेत्यांशी आहे. यात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा समावेश आहे. राज्य सरकारवर आधीच ९.३ लाख कोटी रुपयांचं कर्ज आहे. याच कर्जामुळे लाडक्या बहिणींना महिन्याला २१०० रुपये देणं, शेतकऱ्यांची कर्जमाफी करणं शक्य नसल्याचं सरकारकडून सांगितलं जात आहे.एनसीडीसीकडून कर्ज घेत असताना राज्य सरकारला गॅरंटी द्यावी लागते. कर्ज घेण्याचा निर्णय कॅबिनेटच्या उपसमितीनं घेतला आहे. या समितीचे अध्यक्ष सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आहेत. १८ फेब्रुवारीला झालेल्या एका बैठकीत उपसमितीनं पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याला २९६ कोटी रुपयांचं कर्ज देण्याचा निर्णय घेतला. हा साखर कारखाना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांशी संबंधित आहे.२० मार्चला उपसमितीची आणखी एक बैठक झाली. त्यात मकाई सहकारी साखर कारखान्याला एनसीडीसीकडून १४० कोटी रुपयांचं मार्जिन मनी लोन देण्याचा निर्णय झाला. हा साखर कारखाना सोलापूरच्या करमाळा तालुक्यात आहे. हा कारखाना भाजप नेत्या रश्मी बागल यांच्याशी संबंधित आहे. त्या माजी मंत्री दिगंबर बागल यांच्या कन्या आहेत. दोन्ही कर्ज ८ वर्षांच्या कालावधीसाठी देण्यात आली आहेत. यामध्ये २ वर्षांपर्यंत कोणताही हफ्ता भरावा लागणार नाही. दैनंदिन खर्चांसाठी दिल्या जाणाऱ्या खर्चाला मार्जिन मनी लोन म्हटलं जातं.याशिवाय राज्य सरकारनं शेतकरी सहकारी साखर कारखान्याला जवळपास १८ कोटी रुपयांचं सहाय्य देण्याचा निर्णय घेतला आहे. हा कारखाना लातूरच्या किल्लारी तालुक्यात येतो. तो भाजप आमदार अभिमन्यू पवार यांच्याशी संबंधित आहे. अभिमन्यू पवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अतिशय निकटवर्तीय मानले जात आहेत. फडणवीसांचे स्वीय सचिव म्हणून त्यांनी काम केलं आहे.




# नवऱ्याच्या भानगडी सोळा, बायकोने व्हॉट्सअ‍ॅप हॅक करुन डेटा केला गोळा, काय घडलं पुढे?

**नागपूर:** एका महिलेने आपल्या पतीचे कारनामे उघडे पाडत अनेक महिलांची त्याच्या तावडीतून सुटका केली. आरोपी अविवाहित असल्याचे भासवून महिलांशी मैत्री करुन त्यांच्याशी शारीरिक संबंध ठेवत आणि त्या संबंधांचे चित्रीकरण करुन त्याआधारे महिलांना ब्लॅकमेल करत असत. याचा सुगावा आरोपीच्या पत्नीला लागताच तीने त्याचा व्हॉट्सअ‍ॅप हॅक करुन मिळालेला सर्व डेटा पोलिसांना दिला. आणि पीडित महिलांची या जाळ्यातून सुटका केली. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अब्दुल शारिक कुरेशी उर्फ साहिल (वय ३३) असे आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आपण अविवाहीत() असल्याचे भासवून अल्पवयीन मुली आणि महिलांना फसवत असे. यानंतर तो त्यांना लग्नाचे आमिष दाखवून त्यांच्यासोबत वारंवार लैंगिक संबंध ठेवत असे. संबंध प्रस्थापित करताना तो महिलांचे अश्लिल व्हिडिओ बनवत. आणि नंतर त्यांना ब्लॅकमेल करत असे. एवढेच नाही तर आरोपी त्याच्या पत्नीवरही अनैसर्गिक लैंगिक संबंध ठेवण्यासाठी दबाव आणत असे.या संदर्भात आरोपीच्या पत्नीने पाचपौली पोलिस ठाण्यात गुन्हाही दाखल केला होता. आरोपीच्या पत्नीने सांगितले की, त्या दोघांचे लग्न २०२१ मध्ये झाले होते. आणि त्यांना तीन वर्षांची एक मुलगी देखील आहे. आरोपी टेका नाका येथे पानाचे दुकान चालवतो. आरोपीच्या पत्नीने सांगितले की, एके दिवशी तीने चुकून आरोपीचे व्हॉट्सअ‍ॅप() अकाउंट उघडले. त्यातील इतर मुलींसोबतचे त्याचे चॅट, आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडिओ पाहून तीला धक्का बसला. आरोपी केवळ अनेक महिलांना ब्लॅकमेल करत नव्हता तर एका अल्पवयीन मुलीलाही त्रास देत होता, हेही त्यातून उघड झाले. त्यामुळे तीने आरोपीचा व्हॉट्सअ‍ॅप हॅक करुन सर्व डेटा पुरावा म्हणून स्वतःच्या मोबाईलमध्ये घेतला. आरोपीने एका अल्पवयीन मुलीला आपल्या जाळ्यात ओढले होते. इतकेच नाही तर मुलीच्या आईने तिला भेट दिलेली सोन्याची अंगठी ३०,००० रुपयांना विकण्यास भागही पाडले. ही बाब उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी मुलीच्या तक्रारीवरून नवीन गुन्हा दाखल केला आणि आरोपीला अटक केली. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, इतर महिलांनाही तक्रार दाखल करण्यास सांगण्यात आले होते, परंतु सामाजाच्या भितीमुळे इतर महिलांनी तक्रार दाखल केली नाही. सध्या पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.



# विराट उचलणार मोठे पाऊल, २०२७ वर्ल्ड कपबाबत दिली मोठी हिंट...

**मुंबई:** सध्या सर्वत्र आयपीएलचे वातावरण पाहायला मिळत आहे. आयपीएलची सुरुवात काही संघासाठी चांगली झालेली दिसली तर काही संघासाठी वाईट. आयपीएलमध्ये सध्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरुचा संघ चांगले प्रदर्शन दाखवतं आहे. बेंगळुरुचा आगामी सामना उद्या गुजरातसोबत रंगणार आहे. याआधी कोहलीच्या एका विधानाची जोरदार चर्चा रंगली. कोहलीचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होताना दिसत आहे.विराट कोहलीने १५ सेकंदात त्याच्या चाहत्यांना सर्वात मोठा आनंद दिला आहे. त्याने चाहत्यांच्या मनात आणि हृदयात असलेल्या सर्वात मोठ्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. म्हणजे आता कोणताही संशय नाही किंवा कोणताही प्रश्न उरत नाही. चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर, विराट कोहलीच्या भविष्याबद्दल आणि २०२७ च्या विश्वचषकापर्यंत त्याच्या खेळण्याबद्दल बरीच चर्चा झाली. पण आता आयपीएलमध्ये कोहलीने त्याबाबत आपले हेतू स्पष्ट केले आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या १५ सेकंदांपेक्षा कमी कालावधीच्या व्हिडिओमध्ये त्याने स्पष्टपणे म्हटले आहे की, त्याला २०२७ चा विश्वचषक खेळायचा आहेच, पण तो जिंकायचाही आहे.




विराट कोहलीला विचारण्यात आले की, सध्याच्या घडीला त्याचे मोठे पाऊल काय असणार आहे याबद्दल काही संकेत देऊ शकेल का? यावर विराट कोहली म्हणाला की, मला माहित नाही की माझे पुढचे मोठे पाऊल काय असेल? पण कदाचित असे होऊ शकते की मी २०२७ चा एकदिवसीय विश्वचषक जिंकण्याचा प्रयत्न करू शकेन. व्हिडिओवरून हे स्पष्ट होते की विराट कोहली सध्या निवृत्तीचा विचार करत नाही. जर तो सध्या कोणत्याही गोष्टीबद्दल विचार करत असेल तर तो २०२७ चा विश्वचषक खेळण्याचा आणि जिंकण्याचा आहे.२०२५ च्या आयपीएलमध्ये विराट कोहलीची कामगिरी २०२७ चा विश्वचषक जिंकल्याचा अभिमान बाळगणारा विराट कोहली सध्या आयपीएल २०२५ मध्ये खेळत आहे. नेहमीप्रमाणे, तो आरसीबीचा भाग आहे, ज्याने लीगमध्ये आतापर्यंत खेळलेले दोन्ही सामने जिंकले आहेत. त्या दोन सामन्यांमध्ये विराट कोहलीने एका अर्धशतकासह ९० धावा केल्या आहेत.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तुझ्या बॉयफ्रेण्डवर काळी जादू झालेय, मी मेणबत्तीने जाळेन, मुंबईकर तरुणीची साडेतीन लाखांना फसवणूक...

**मुंबई :** प्रियकर नीट वागत नसल्याने तरुणी अस्वस्थ होती, प्रियकराचे इतर कुणावर तरी प्रेम असावे, असा तिला संशय होता. मनात नाना तऱ्हेचे विचार येत असताना समाज माध्यमावर ऑनलाइन भविष्य जाणून घ्या, अशी जाहिरात तिच्या नजरेस पडली. नोंदणी केल्यावर तिने प्रियकराबाबत विचारले. मात्र काळी जादू करण्यात आली आहे, असे सांगून पूजाविधीसाठी तिच्याकडून साडेतीन लाख रुपये उकळण्यात आले. मुंबईतील सांताक्रूझ परिसरात राहणारी साक्षी (बदललेले नाव) हिची गेल्या वर्षी एका तरुणाशी ओळख झाली. ओळखीतून मैत्री आणि मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. सुरुवातीला त्याचे वागणे ठीक होते, मात्र काही दिवसांनी तो तिला टाळू लागला. भेटायला गेल्यावर तो नीट वागत नसल्याने त्याचे दुसऱ्या मुलीवर प्रेम असल्याचा साक्षीला संशय होता.मनात वेगवेगळे विचार घुटमळत असताना काही दिवसांपूर्वी साक्षीने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी पाहिली. २५१ रुपये भरून करिअर आणि रिलेशनशिपची माहिती जाणून घ्या, असे यात नमूद करण्यात आले होते. या जाहिरातीनुसार तिने २५१ रुपये भरून नोंदणी केली. त्यानंतर तरुणीने त्या दोघांचे फोटो आणि नावे पाठवली.पैसे आणि माहिती पाठवल्यानंतर एका व्यक्तीचा साक्षीला फोन आला. तुमच्या प्रियकरावर कुणीतरी काळी जादू केली आहे. या काळ्या जादूच्या प्रभावामुळे तो तुमच्या सोबत राहण्यास तयार होत नाही आणि नीट वागतही नाही, असे या व्यक्तीने सांगताच साक्षीने कोणतीही खातरजमा न करता त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. प्रियकरावर झालेली काळी जादू मेणबत्ती जाळून टाकतो, असा दावा या व्यक्तीने केला. मात्र त्यासाठी पैसे द्यावे लागतील, असे तिला सांगण्यात आले.

त्यानुसार तिने दिलेल्या बँक खात्यामध्ये पैसे पाठविले. ऑनलाइन पूजाविधीचे कारण सांगून त्याने वारंवार साक्षीकडून पैसे घेतले. सुमारे साडेतीन लाख खर्च करूनही तिच्या जीवनात काही बदल झाला नव्हता. याच दरम्यान तिचा प्रियकरासोबतचा संपर्क तुटला. त्याचा फोन येईल, त्यासाठी थोडे थांबावे लागेल. आणखी काही विधी करावे लागतील आणि त्यासाठी राजस्थानला यावे लागेल, असे या व्यक्तीने साक्षीला सांगितले. सर्व काही संशयास्पद वाटल्याने अधिक माहिती काढली असता ही सर्व फसवणूक असल्याचे लक्षात आले आणि तिने वाकोला पोलिस ठाण्यात धाव घेतली. तिच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. तांत्रिक माहितीच्या आधारे फसविणाऱ्यांचा शोध घेतला जात असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.




## तर त्यांनी माझेही तुकडे केले असते, नानामुळे वाचलो... अशोक सराफ यांनी धक्कादायक प्रसंग, काय घडलेलं नेमकं?



**मुंबई:** मराठी आणि हिंदी सिनेइंडस्ट्रीतील दोन दिग्गज कलाकार अभिनेते अशोक सराफ आणि नाना पाटेकर यांनी त्यांच्या मैत्रीबद्दल अनेकदा सांगितलं आहे. नाना पाटेकर तसंच अशोक सराफ या दोघांनीही त्यांच्या मैत्रीचे खास किस्से यापूर्वी अनेकदा शेअर केले आहेत. आता अशोक सराफ यांनी सांगितलेला एक किस्सा चांगलाच चर्चेत आला आहे.तर अशोक सराफ यांनी नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत अनेक विषयांवर गप्पा मारल्या. यात त्यांनी जुने किस्सेही शेअर केले. यात त्यांनी एक धक्कादायक प्रसंगही सांगितला. एका नाटकाच्या प्रयोगादरम्यानचा हा किस्सा आहे. हमीदाबाईची कोठी या नाटकादरम्यानचा हा किस्सा.हमीदाबाईची कोठी हे नाटक सुरू होतं तेव्हा अशोक सराफ यांची वेगळीच क्रेझ होती. प्रचंड लोकप्रिय असलेल्या या स्टार अभिनेत्याला पाहण्यासाठी जिथं जाईल तिथं गर्दी व्हायची. एका गावात या नाटकाचा प्रयोग होता. अशोर सराफ यांना पाहण्यासाठी गावच्या गाव जमा झालं होतं. अशोक मामांना पाहण्यासाठी गावकऱ्यांनी एकच गर्दी केली होती. तेव्हा नाना पाटेकरांनी या गर्दीतून सुखरुप बाहेर काढल्याची आठवण मामांनी सांगितली.एका मिल मध्ये हमीदाबाईची कोठी या नाटकाचा प्रयोग होता. तिथं रंगमचं वगैरे नव्हता. एका चौथऱ्यावर नाटकाचा सेट लावण्यात आला होता.तर हे नाटक करताना झालं असं की कोठीवरच्या बायका खाली बसलेल्या असायच्या त्यामुळं कलाकारांनाही उभं न राहता बसूनच नाटक करावं लागायचं. त्यामुळं मागे बसलेल्या प्रेक्षकांना काही ते व्यवस्थित दिसायचं नाही. त्यामुळं तिथं एकच गोंधळ झाला होता. या गोंधळामुळं नाटक बंद करण्यात आलं होतं.नंतर आम्ही कलाकार आत जाऊन बसलो. उभं राहून नाटक करा, असं प्रेक्षकांचं म्हणणं होतं. पण उभं राहून कसं करणार हे नाटक, कोठीवरचं नाटक आहे, हे त्यांन आम्ही समजावलं. पण गोंधळ वाढला. लोकांनी खुर्च्या तोडल्या, ट्युबलाइट्स फोडल्या. ड्रायव्हरलाही मारहाण करण्यात आली होती, असं अशोक सराफ यांनी सांगितलं. लोकसत्ताला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.

उतारवयातील प्रेम, अन् अशोक सराफ आणि वंदना गुप्तेंची अशी ही जमवा जमवी आहे तरी काय ? नानाला माहिती होतं ती, चिडलेले हे लोक सगळ्यात आधी मला पकडणार. त्यामुळं तो मला घेऊन मागच्या गेटमधून बाहेर पडला. बाहेर पडलो तर काळोख, चिखल होता. या चिखलातून पळत आम्ही मुख्यरस्त्यापर्यंत आलो आणि रिक्षा पकडली. ती रिक्षा चालवत नानानं मला आमच्यारेस्टहाऊसपर्यंत सोडलं.नाही तर माझेही तेव्हा तुकडे झाले असते...असंही अशोक सराफ यावेळी म्हणाले.

## मोदींनी कधी निवृत्त व्हावे हे जनता ठरवते, सकाळच्या भोंग्यावर ठरत नाही; संजय राऊतांना प्रत्युत्तर

**नागपूर :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवृत्तीबाबत केलेल्या विधानावर भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. मोदींनी कधी निवृत्त व्हावे हे जनता ठरवते, सकाळच्या भोंग्यावर ठरत नाही, अशा शब्दांत त्यांनी राऊतांवर निशाणा साधला.चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक्सवर ( ट्विटर) पोस्ट करत संजय राऊत यांच्या वक्तव्याला राजकीय स्टंटबाजी असल्याचे म्हटले. ७५ वर्षांनंतर नरेंद्र मोदींनी राजकारण सोडावे, असा कोणताही नियम नाही. भाजपच्या अधिकृत धोरणातही असे काही नमूद केलेले नाही. तसेच भारतीय संविधानातही अशा प्रकारचा कोणताही ठराव नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.बावनकुळे यांनी इतिहासातील उदाहरणे देत विरोधकांना प्रत्युत्तर दिले. भारतीय लोकशाहीत अनेक पंतप्रधान वयोमानानुसार मोठ्या वयातही देशाचे नेतृत्व करत राहिले. अटलबिहारी वाजपेयी ७९ वर्षांपर्यंत पंतप्रधान होते. मोरारजी देसाई यांनी ८३ व्या वर्षी पंतप्रधानपद भूषवले, तर डॉ. मनमोहन सिंग ८१ वर्षांपर्यंत पंतप्रधान होते. मात्र, भाजप द्वेषाने पछाडलेल्या संजय राऊतांना हे आठवत नाही, असा टोला त्यांनी लगावला. तसेच पंतप्रधानांनी कधी निवृत्त व्हायचे हे संजय राऊत किंवा विरोधक नाही, तर लोकशाहीतील जनादेश ठरवतो. मोदींच्या नेतृत्वावर देशाची जनता विश्वास दाखवते. त्यामुळे त्यांची निवृत्ती विरोधकांच्या इच्छेवर अवलंबून नाही, असेही बावनकुळे म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २०४७ पर्यंत भारत विकसित करण्याचा संकल्प केला आहे आणि तो त्यांच्या नेतृत्वाखालीच पूर्ण होईल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला. भाजप नेत्यांचे हे विधान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकीय संघर्ष आणखी तीव्र करण्याची शक्यता आहे. संजय राऊत यांनी मोदींच्या निवृत्तीबाबत केलेल्या विधानानंतर भाजपकडून जोरदार प्रतिउत्तर येत असून यावर शिवसेनेची अधिकृत प्रतिक्रिया येणे बाकी आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मिशन लक्ष्यवेध अंतर्गत खाजगी अकादमी सक्षमीकरणासाठी आर्थिक सहाय्य; प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलडाणा**

राज्य शासनाने मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवड करण्यात आलेल्या ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग, हॉकी, लॉन टेनिस, रोईंग, शुटींग, सेलींग, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, कुस्ती या १२ क्रीडा प्रकारात दर्जेदार खेळाडू निर्माण करणाऱ्या खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य देऊन अश्या संस्थांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यातील खाजगी अकादमींनी/संस्थांनी प्रस्ताव सादर करावा. असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बाळकृष्ण महानगर यांनी केले आहे.
राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे. राज्यातील खेळाडूंनी ऑलिम्पिक सारख्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदके संपादित करण्याकरीता राज्यातील खेळाडूंसाठी अद्ययावत क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडा विषयक पायाभुत सुविधा, क्रीडा वैद्यकशास्त्र, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, खेळाडूंना पुरस्कार व प्रोत्साहन, खेळाडूंकरीता करीअर मार्गदर्शन व खेळाडूंच्या क्षमता विकासासाठी देशी/विदेशी प्रशिक्षक व संस्थांचा सहयोग हे सर्व घटक विकसित करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने ङ्कङ्घमिशन लक्ष्यवेध या महत्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवडण्यात आलेल्या ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग, हॉकी, लॉन टेनिस, रोईंग, शुटींग, सेलींग, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, कुस्ती या १२ क्रीडा प्रकारांच्या राज्यातील उत्तम खेळाडू निर्माण करणाऱ्या खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य देऊन अशा संस्थांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. मिशन लक्ष्यवेध अंतर्गत खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य करावयाच्यादृष्टीने संबधित अकादमी मधील खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, सहाय्यक प्रशिक्षक, प्रशिक्षणासाठी उपलब्ध पायाभुत सुविधा व त्यांचा स्तर, क्रीडा, साहित्य व क्रीडा अकादमीच्या कामगिरींचे गुणांकन करण्यात येऊन, ३५ ते ५० गुण प्राप्त करणाऱ्या संस्था ङ्कक्फ्न्वर्ग, ५१ ते ७५ गुण प्राप्त करणाऱ्या संस्था ङ्कबफ्न्वर्ग व ७६ ते १०० गुण प्राप्त करणाऱ्या संस्था ङ्कअफ्न्वर्ग अश्या प्रकारे वर्गीकरण करण्यात येणार आहे. ङ्कक्फ्न्वर्ग अकादमींना वार्षिक रु.१० लक्ष, ब वर्ग अकादमींना वार्षिक रु.२० लक्ष व ङ्कअफ्न्वर्ग अकादमींना वार्षिक रु.३० लक्ष आर्थिक सहाय्य, पायाभुत क्रीडा सुविधा उभारणी, क्रीडा सुविधा उन्नत करणे, प्रशिक्षक मानधन, क्रीडा व प्रशिक्षण उपकरणे इ बाबींवर खर्च करण्यासाठी देण्यात येणार आहे. त्यानुसार जिल्ह्यातील इच्छुक संस्थांनी अर्जाच्या विहीत नमून्यासाठी तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे संपर्क साधावा व सदर योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

# रक्तदान शिबीराचे आयोजन करण्याचे आवाहन



**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा रुग्णालय येथील रक्त साठा अल्प प्रमाणात शिल्लक असून रक्त पुरवठा संकलन करणे आवश्यक आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्व सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक संघटनांनी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा रुग्णालय रक्त केंद्र जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी यांनी केले आहे.
रक्त केंद्रातून प्रती महिना सरासरी ३०० रक्त पिशव्या ह्या निशुल्क रक्त संक्रमणासाठी उपलब्ध केल्या जात आहे. उन्हाळ्यामध्ये रक्त दान शिबिरांचे आयोजन होत नसल्यामुळे रक्त संकलन ठप्प झाले आहे. तसेच या कालावधीत रक्ताची मागणी जास्त असल्याने रक्त केंद्रात अल्प प्रमाणात रक्त पिशव्या शिल्लक आहे. थॅलेसीमिया व सिकल सेल रुग्ण यांना कायमस्वरुपी आणि अपघात झालेल्या व्यक्ती, गर्भवती स्त्रिया व इतराना आपत्कालीन परिस्थितीत रक्ताची गरज असते. त्यामुळे जास्तीत जास्त रक्त संकलन होण्यासाठी स्वयंसेवी संस्थानी रक्तदान शिबीरांचे आयोजन करुन रक्तदान करण्यास पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील धरणात १५२.७८ दलघमी पाणीसाठा पाच तालुक्यात १९ टँकरद्वारे पाणी पुरवठा...

# जिल्हा व तालुका प्रशासनाच्या उपाययोजना सुरु पाणी जपून वापरण्याचे नागरिकांना आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

पाटबंधारे विभागांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पांमध्ये आज रोजी १५२.७८६ दलघमी (३२.६५ टक्के) पाणी साठा उपलब्ध आहे. उन्हाळ्यातील पाणीटंचाई निवारणासाठी जिल्हा व तालुका प्रशासनाने उपाययोजना सुरु केल्या असून त्यानुषंगाने जिल्ह्यातील पाच तालुक्यातील १७ गावांमध्ये १९ खाजगी टँकरव्दारे पाणी पुरवठा केला जात असल्याची माहिती पाटबंधारे विभागाने दिली आहे.
जिल्ह्यातील नळगंगा, खडकपूर्णा आणि पेनटाकळी या तीन मोठ्या प्रकल्पामध्ये ७१.६६२ दलघमी(३२.१८ टक्के) तर ज्ञानगंगा, मस, कोराडी, पलढग, मन, तोरणा व उतावळी या सात मध्यम प्रकल्पामध्ये ५३.६८० दलघमी (३७.८९ टक्के) व ४१ लघु प्रकल्पामध्ये २७.४४४ दलघमी (२६.४९ टक्के) पाणी साठा उपलब्ध आहे.
जलाशय पातळी अहवालानुसार मोठ्या प्रकल्पांतर्गत नळगंगा प्रकल्पामध्ये ३५.३२ दलघमी(५१ टक्के), खडकपूर्णा प्रकल्पामध्ये ८.३२ दलघमी (९ टक्के), पेनटाकळी प्रकल्पामध्ये २८.०२ दलघमी(४७ टक्के) या तीन मोठ्या प्रकल्पामध्ये एकूण ७१.६६२ दलघमी (३२.१८ टक्के) पाणी साठा उपलब्ध आहे. तर मध्यम प्रकल्पांतर्गत येणाऱ्या ज्ञानगंगा प्रकल्पामध्ये २२.०५ दलघमी(६५ टक्के), मस प्रकल्पामध्ये ५.२४ दलघमी (३५ टक्के), कोराडी प्रकल्पामध्ये ३.६९ दलघमी (२४.४० टक्के), पलढग प्रकल्पामध्ये १.२४ दलघमी (१७ टक्के), मन प्रकल्पामध्ये १४.३६ दलघमी (३९ टक्के), तोरणा प्रकल्पामध्ये ०.७५ दलघमी (१० टक्के), उतावळी प्रकल्पामध्ये ६.३५ दलघमी (३२ टक्के) असे एकूण सात मध्यम प्रकल्पामध्ये ५३.६८ दलघमी (३७.८९ टक्के) पाणी साठा उपलब्ध आहे. तसेच एकूण ४१ लघु प्रकल्पामध्ये २७.४४४ दलघमी (२६.४९ टक्के) पाणी साठा उपलब्ध आहे.
पाच तालुक्यात १९ टँकरने पाणी पुरवठा
पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा जिल्ह्यातील पाच तालुक्यातील १७ गावांसाठी १९ टँकर पाणी पुरवठ्याकरिता मंजूर करण्यात आले आहे. यामध्ये मेहकर तालुक्यातील ६, बुलढाणा येथे ५, चिखली येथे ३, सिंदखेड राजा येथे १ अशा १५ गावांसाठी प्रत्येकी एक टँकर तर देऊळगावा राजा येथील २ गावांसाठी ४ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे.
टँकरने होणारा पाणीपुरवठा याप्रमाणे: मेहकर तालुक्यातील पारडी, जवळा, हिवरा साबळे, वरवंड, बोथा व पाथर्डी या गावांसाठी प्रत्येकी एक टँकर. बुलढाणा तालुक्यातील पिंपळगाव सराई, सैलानी, ढासाळवाडी, पिंपरखेड व चौथा गावांसाठी प्रत्येकी एक टँकर, चिखली तालुक्यातील कोलारा,श्रीकृष्णनगर व भालगाव येथे प्रत्येकी एक टँकर, सिंदखेड राजा तालुक्यातील सारगाव माळ येथे एक टँकर. तसेच देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा येथे तीन टँकर तर निमखेड येथे एक टँकरव्दारे दररोज पुरवठा करण्यात येत आहे, अशी माहिती ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी कळविले आहे.
शहरी व ग्रामीण भागात पाणी पुरवठ्यासाठी उपाययोजना सुरु - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील
उन्हाळ्यातील पाणीटंचाई लक्षात घेता नागरिकांना पुरेशा पाणी पुरवठ्यासाठी जिल्हा व तालुका



प्रशासनाकडून तातडीच्या उपाययोजना राबविल्या जात आहेत. तीव्र पाणीटंचाई भागांमध्ये खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था केली जात आहे. ग्रामीण भागातील १०८ गावात ११८ विहिरी अधिग्रहण करून पाणी पुरवठा देखील केला जात आहे. पाणीटंचाई टाळण्यासाठी नागरिकांनी जपून पाणी वापरावे आणि त्याचा अपव्यय टाळावा. प्रशासन आपल्या स्तरावर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करत आहे, असे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सांगितले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शोभायात्रेने दुमदुमली हिवरा आश्रम नगरी

**जनसंचलन/हिवरा आश्रम**

प.पू. शुकदास महाराजांच्या मूर्तीच्या शोभायात्रेने मंगळवारी हिवरा आश्रम येथे प्राणप्रतिष्ठा विधीला प्रारंभ झाला. विवेकानंद आश्रमातून सकाळी ८ वाजता संस्थेचे आर. बी. मालपाणी आणि अशोक थोरहाते यांच्या हस्ते पूजन करून शोभायात्रेला सुरुवात करण्यात आली. महाराजांनी निर्माण केलेल्या शैक्षणिक परिसरातून शोभायात्रा जात असताना हजारो विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद की जय, प.पू. शुकदास महाराज की जय, भारतमाता की जय अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने शोभायात्रेत सहभाग घेतला. ठिकठिकाणी यात्रेचे स्वागत व पूजन करण्यात आले. सहभागी दिंड्यांसाठी चहा-पाण्याची केली होती. व्यवस्था पूर्वी दुर्लक्षित असलेल्या हिवरा आश्रम परिसराला महाराजांनी



विवेकानंद आश्रमाच्या स्थापनेद्वारे प्रतिष्ठा मिळवून दिली. महाराजांमुळेच हे गाव आणि आम्ही ग्रामस्थ आहोत. त्यांचे समाधी मंदिर हे आमचे ग्रामदैवत आहे. अत्यंत कष्टाने जनकल्याणाचा व्यापक दृष्टिकोन लक्षात घेऊन महाराजांनी दर्जेदार संस्था उभारल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. सकाळपासूनच भजनी दिंड्या आश्रमात दाखल झाल्या होत्या. प्राणप्रतिष्ठा विधी सुरू ब्रह्मवृंद आणि वारकऱ्यांच्या उपस्थितीत प्राणप्रतिष्ठा विधीला प्रारंभ झाला. संकल्प, स्नान, भगवतचिंतन, गोदान आणि मुंडण करून यजमानांनी एक हजार स्क्वेअर फूट यज्ञमंडपात विधीवत पूजेस सुरुवात केली. मुंबई येथील रवी कलंत्रे, डॉ. जगदीश सांबपुरे, दयानंद थोरहाते, पुरुषोत्तम आकोटकर आणि आत्माराम दळवी या मान्यवरांना पंचकुंडी यज्ञाच्या पाच दिवसीय पूजेसाठी मान मिळाला. अयोध्या येथील श्रीराम मंदिर पूजेसाठी असलेले पंडित या विधीसाठी निमंत्रित करण्यात आले. त्यामुळे परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे

# शेतीच्या कारणावरुन दोन गटात वाद



**जनसंचलन/मोताळा**

शेतीच्या कारणावरून दोन गटांमध्ये वाद होऊन हातात कुऱ्हाड आणि विळा घेऊन जीवे मारण्याची तसेच बंदुकीने उडवून देण्याची धमकी दिल्याची घटना ३० मार्च रोजी संध्याकाळी सुलतानपूर शिवारात घडली. परस्परविरोधी तक्रारीवरून दोन्ही गटांतील दहा जणांविरुद्ध बोराखेडी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. कोथळी येथील किशोर पाटील यांनी प्रकरणात तक्रार दिली. त्यांची शेती सुलतानपूर शिवारात आहे. ३० मार्च रोजी संध्याकाळी गावातील गोपाल सातव, मनीष सातव, विवेक सातव, दामोदर सातव, सुधाकर सातव आणि तरोडा येथील नारायण रबडे या सहा जणांनी शेताच्या धुऱ्याच्या कारणावरून वादग्रस्त शेतात ट्रॅक्टर घालून बांध टाकून नांगरणी केली. हटकले असता त्यांनी कुऱ्हाडी आणि विळे हातात घेऊन जीवे मारण्याची धमकी दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दुसऱ्या गटातील कोथळी येथील मनीष सातव यांनी पोलिसांत तक्रार दिली. ३१ मार्च रोजी सकाळी ते घरी असताना, गावातील किशोर पाटील, त्यांची पत्नी राधा, मुलगा ऋषिकेश आणि शंतनू घरासमोर आले. ङ्कतू माझे शेत का नांगरले?ङ्क असे म्हणत शिवीगाळ करून चापट-बुक्क्यांनी मारहाण केली. प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वडिलोपार्जित जमिनीच्या वादातून दोन गटांत हाणामारी

**जनसंचलन/ अमडापूर**

वडिलोपार्जित जमिनीच्या वादातून दोन गटांत हाणामारी झाली. या प्रकरणी सुनीता गुंजकर यांच्या तक्रारीवरून सहा जणांविरोधात अमडापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही तक्रार ३१ मार्च रोजी नोंदविण्यात आली. तक्रारीत नमूद केले आहे की, टाकरखेडा हेलगा येथील सुनीता गुंजकर यांचे चुलत दीर गजानन गुंजकर हे त्यांच्या घराशेजारी राहतात. मात्र, वडिलोपार्जित जमिनीवरून सातत्याने वाद निर्माण करत असतात. तीन महिन्यांपूर्वी घरकाम करण्याच्या निमित्ताने त्यांनी जेसीबी आणून सुनीता गुंजकर यांच्या घराची भिंत तोडली. त्याला जाब विचारण्यासाठी गेले असता, गजानन गुंजकर यांनी ती जमीन आपलीच असल्याचा दावा केला. ३१ मार्च रोजी, गजानन गुंजकर,



ज्योती गुंजकर आणि रुद्र गुंजकर यांनी घर बांधकामाच्या नावाखाली सुनीताच्या स्वच्छतागृहाच्या विटा उखडून टाकल्या. विरोध केला असता, आरोपींनी सुनीता, अनंता आणि त्यांच्या कुटुंबीयांना लाठी-काठ्यांनी मारहाण केली असे तक्रारीत नमूद आहे. त्यावरून गजानन गुंजकरसह सहा जणांविरोधात गुन्हा दाखल झाला.

# रेतीचा अवैध उपसा, जबाबदारीच्या साखळीत कोण दोषी?

## रेतीचा अवैध उपसा कसा रोखणार?

**जनसंचलन/ बुलढाणा**

जिल्ह्यातील रेतीच्या अवैध उपशाच्या समस्येचे मूळ केवळ माफियांमध्येच नाही, तर प्रशासनातील काही निष्क्रिय घटक आणि राजकीय हस्तक्षेप यामध्येही असू शकते. महसूल व पोलिस प्रशासनाने वेळोवेळी कारवाया केल्या असल्या, तरी त्यांचा अपेक्षित परिणाम टिकून राहत नाही. अनेकदा कारवायांनंतर काही काळ शांतता दिसते, त्यानंतर लगेच अवैध उपसा पुन्हा सुरू होतो. त्यामुळे अवैध वाहतूक रोखण्यासाठी असलेल्या जबाबदारीच्या साखळीत दोषी कोण, असा प्रश्न उपस्थित होत आहे. जिल्ह्यातील काही भागांमध्ये स्थानिक ग्रामस्थ या समस्येविरोधात आक्रमक झाले आहेत. जलस्तर घटल्याने शेतकऱ्यांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. परिणामी, रास्ता रोको, आंदोलन तसेच थेट रेतीची अवैध वाहतूक करणारे ट्रक अडविण्याचे प्रकार घडले आहेत. काही ठिकाणी ग्रामस्थांनी स्वतःहून अवैध वाहतूक रोखण्याचे प्रयत्न केले आहेत. तसेच, जिल्हा प्रशासनाकडे तटस्थ यंत्रणेमार्फत रेती उपशाचे सर्वेक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, बांधकाम व्यावसायिक कायदेशीर मार्गाने वाळू उपलब्ध न झाल्याने अडचणीत सापडले आहेत. त्यांनी शासनाकडे स्थिर धोरण तयार करून नियोजनबद्ध वाळू लिलाव करण्याची मागणी केली आहे. राजकीय पातळीवर मात्र ही समस्या केवळ आरोप प्रत्यारोपांपुरती मर्यादित राहिली आहे. एकमेकांवर दोष टाकून जबाबदारी महसूल, पोलिस, पाटबंधारे विभागाने समन्वयाने काम करून रेतीचा अवैध उपसा रोखण्यासाठी धोरणात्मक निर्णय होण्याची गरज आहे झटकली जात आहे.या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पारदर्शक लिलाव प्रक्रिया, प्रभावी अंमलबजावणी, जनसहभाग आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे राजकीय इच्छाशक्ती आवश्यक आहे. अन्यथा, अवैध रेती उपसा असाच सुरू राहील. बुलढाणा जिल्ह्यातील मराठवाड्याच्या सीमेलगत अवैध रेती उपशामुळे गंभीर घटना घडल्या आहेत. एका प्रकरणात खून झाला असून, दुसऱ्या घटनेत चांडोळ परिसरात पुलाच्या बांधकामाजवळ पहाटे रेती उतरताना घाईगडबडीत झालेल्या दुर्घटनेत पाच मजुरांचा मृत्यू झाला. त्यामध्ये बुलढाण्यातील दहीद येथील एका मजुराचाही समावेश होता. गेल्या एक-दोन महिन्यांत विदर्भ-मराठवाडा सीमेलगत वाळूच्या अवैध उपशामुळे अनेकांना प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे आता प्रशासकीय पातळीवर ठोस उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा, ही समस्या अधिक गंभीर स्वरूप धारण करू शकते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958